# उत्तम देशसेवा करू

## ‘एनडीए’च्या छात्रांची भावना; १३१ व्या तुकडीचे दीक्षान्त संचलन

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

‘लष्करात जाऊन देशसेवेची संधी मिळणे, ही खूप अभिमानाची बाब आहे. त्यासाठी आम्हाला आमच्या कुटुंबीयांनी प्रोत्साहन दिले आहे. ‘एनडीए’मधील खडतर प्रशिक्षणातून आमचा पाया मजबूत झाला आहे. भविष्यात चांगले लष्करी अधिकारी बनून आम्ही उत्तम पद्धतीने देशसेवा करू,’ अशी ग्वाही राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी अर्थात ‘एनडीए’च्या १३१ व्या तुकडीतील पदक विजेत्या छात्रांनी दिली. तिन्ही पदक विजेते छात्र डेहराडून येथील इंडियन मिलिटरी अॅकॅडमीत पुढील प्रशिक्षण घेऊन लष्कराच्या पायदळात (इन्फंट्री) दाखल होतील.

ओडिशातील भुवनेश्वरच्या चंद्रकांत आचार्यने सुवर्णपदक पटकावले. ‘आठवीनंतर मी सैनिकी शाळेत प्रवेश घेतला. त्यानंतर लष्करात जाऊन देशसेवा करण्यासाठी घरच्यांनी प्रोत्साहन दिले. माझी आई व चुलत भाऊ माझा आदर्श आहेत. ‘एनडीए’मधील तीन वर्षांचे प्रशिक्षण खडतर असले, तरी त्यातून आमचा पाया मजबूत झाला आहे,’ असे चंद्रकांतने सांगितले.

राजस्थानच्या हेमंत पुनिया याने रौप्यपदक पटकावले. ‘एनडीए’मधील अनुभव मला समृद्ध करणारा होता. माझे आई-वडील शिक्षक आहेत. लष्करात असलेल्या काकांच्या प्रोत्साहनामुळे मी लष्करात जायचे ठरवले. माझ्या यशाचे श्रेय या शाळेला व कुटुंबीयांना जाते,’ असे हेमंत याने सांगितले.

पंजाबमधील अमरप्रीत धत्त याने कांस्यपदक पटकावले. त्याचे वडील पंजाब पोलिस दलात कार्यरत आहेत. ‘मला इंजिनीअर व्हायचे होते. पण माझे कुटुंबीय आणि काका यांच्या प्रोत्साहनामुळे मी लष्करात जाण्यासाठी ‘एनडीए’त दाखल झालो,’ असे अमरप्रीतने सांगितले.

सदानंद गोडसे



राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी अर्थात एनडीच्या १३१ व्या तुकडीचे दीक्षान्त संचलन खेत्रपाल मैदानावर मंगळवारी दिमाखात पार पडले.

## ‘आव्हाने झेलण्यास लष्कर सक्षम’

**पुणे :** ‘सध्या सीमेवर अशांतता असली, तरी आम्हाला शेजारी राष्ट्रांकडून शांतता अपेक्षित आहे. लष्करी किंवा अन्य कोणत्याही आव्हानाला सामोरे जाण्यासाठी लष्कर सक्षम आहे,’ असे मत संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे यांनी मंगळवारी व्यक्त केले.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) दीक्षान्त संचलनाची मानवंदना स्वीकारल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. भामरे यांनी ही माहिती दिली. ‘युद्धाचे स्वरूप बदलत आहे. आता तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यानुसार लष्करानेही आपल्या प्रशिक्षण व अन्य कार्यपद्धतीत योग्य बदल केले आहेत. मेक इन इंडिया अंतर्गत संरक्षण उत्पादने देशात बनविण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे,’ असेही डॉ. भामरे म्हणाले.

‘संरक्षण दलाच्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे हित जपण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. त्यासाठीच ओआरओपीला मान्यता देण्यात आली. मात्र, त्यात काही समस्या असून त्या सोडविण्यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न सुरू आहेत,’ असे डॉ. भामरे यांनी स्पष्ट केले.

### चंदू चव्हाणसाठी सर्वस्तरीय प्रयत्न

‘चुकून ताबारेषा ओलांडून पाकिस्तानी हद्दीत गेलेल्या चंदू चव्हाण या जवानाला भारतात परत आणण्यासाठी सर्वस्तरीय प्रयत्न सुरू आहेत. चंदू चव्हाण आपल्या ताब्यात असल्याचे पाकिस्तानने मान्य केले आहे, त्यामुळे पाकिस्तानला त्याची सुटका करावी लागेल. चंदू नक्की परत येईल, पण कालावधी निश्चित सांगता येणार नाही,’ असे डॉ. सुभाष भामरे यांनी सांगितले.

### दिमाखदार संचलन, विमानांची सलामी

**पुणे :** राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी अर्थात एनडीच्या १३१ व्या तुकडीचे दीक्षान्त संचलन खेत्रपाल मैदानावर मंगळवारी दिमाखात पार पडले. लष्करी बँडच्या तालावर शिस्तबद्ध संचलन, एकाच वेळी अचूक पडणारी पावले, त्यामुळे घुमणारा बुटांचा आवाज, मान्यवरांना केला जाणारा कडक सॅल्यूट, लष्कराची हेलिकॉप्टर्स, हवाई दलाची प्रशिक्षणार्थी विमाने आणि सुखोई ३० एमकेआय विमानांनी दिलेल्या सलामी यामुळे मैदानावरील वातावरण भारून गेले होते. शिस्तबद्ध संचलनाने उपस्थितांना खिळवून ठेवले. संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे यांनी संचलनाची मानवंदना स्वीकारली. लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल पी. एम. हारिस, एनडीएचे कमांडंट एअर मार्शल जगजितसिंग क्लेर, उपप्रमुख रिअल अॅडमिरल एस. के. ग्रेव्हाल, प्राचार्य ओम प्रकाश शुक्ला उपस्थित होते. ‘नोव्हेंबर स्क्वाड्रन’ला सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी प्रतिष्ठेच्या ‘चीफ ऑफ स्टाफ बॅनर’ व ‘प्रेसिडेंट्स कलर’ने गौरविण्यात आले.

## शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन

**पुणे :** वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटतर्फे ऊस उत्पादकांसाठी ‘ऊस शेती ज्ञानलक्ष्मी’ आणि ‘ऊस शेती ज्ञानयाग’ या ऊसशेती प्रशिक्षण कार्यक्रमांचे ६ ते ३१ डिसेंबरदरम्यान आयोजन करण्यात आले आहे. संपर्क : २६९०२२६८.

## ‘सूर्यकिरणां’नी सारे भारावले

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

क्षणात गिरकी घेत, क्षणात एकत्र येत पुन्हा दूर जात, तर सरळ जात असतानाच एकदम एकत्रित उभ्याने सरळ उंच घेतलेली झेप अशा सूर्यकिरण पथकाच्या विमानांच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांना खिळवून ठेवले. या पथकातील तीन अधिकारी पुण्यातील असल्याने तसेच या पथकातील सर्वच्या सर्व अधिकारी ‘एनडीए’चेच माजी छात्र असल्याने या सादरीकरणाला अभिमान आणि आपुलकीचे वेगळेच परिमाण लाभले होते.

एनडीएच्या १३१ व्या तुकडीच्या दीक्षान्त संचलनानंतर हवाई दलाच्या सूर्यकिरण या पथकाने ही चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांना खिळवून ठेवले. या पथकाचे कमांडिंग ऑफिसर असलेले मूळचे पुण्याचे विंग कमांडर अजित कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली ही प्रात्यक्षिके सादर झाली. ते स्वत:ही या चमूत सहभागी होते. त्यांच्याबरोबर मूळचे पुण्याचे असलेले दोन विंग कमांडर विजय शेळके आणि अश्विन ठाकरे यांचाही या चमूत सहभाग होता. त्यामुळे पुणेकरांसाठी ही अभिमानाची व आपुलकीची बाब ठरली. त्यांच्यासोबत विंग कमांडर वेणू नांबिसान, विंग कमांडर मयांक नौटियाल, विंग कमांडर अखिलेश सिंग, स्क्वाड्रन लीडर शिशिर अरोरा, स्क्वाड्रन लीडर साहिल गांधी, विंग कमांडर प्रशांत ग्रोव्हर, स्क्वाड्रन लीडर प्रवीण आणि स्क्वाड्रन लीटर दाशरथी यांच्या चमूने ही प्रात्यक्षिके सादर केली.

‘आम्ही सर्व ‘एनडीए’चे माजी छात्र आहोत. ‘एनडीए’च्या दीक्षान्त संचलनावेळी आम्हाला एकत्रित प्रात्यक्षिके सादर करण्याची संधी मिळणे ही खूप मोठी, महत्त्वाची आणि अभिमानाची बाब आहे. त्याचा आम्हाला गर्व आहे. अशी प्रात्यक्षिके सादर करणे अत्यंत अवघड, कौशल्याचे काम असून त्यासाठी कठोर मेहनतीची गरज असते,’ असे विंग कमांडर नौटियाल यांनी सांगितले.



दीक्षान्त संचलनाच्या वेळी हवाई दलातर्फे सादर करण्यात आलेली प्रात्यक्षिके.

## डायरी

- **आदर्श शिक्षण मंडळी माजी विद्यार्थी संघटना :** मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी संवाद स्पर्धेचे उद्घाटन : उद्यान प्रसाद मंगल कार्यालय : स. १०
- **संत गाडगेबाबा प्रतिष्ठान :** कर्मयोगी संत गाडगे महाराज यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त कीर्तन संमेलन, : श्री खंडुजीबाबा देवस्थान विठ्ठल मंदिर, लकडी पूल कोपरा: स. १०.३०
- **स्त्री आधार केंद्र :** महिलांची सुरक्षितता व घ्यावयाची काळजी या विषयावर व्याख्यान, वक्त्या : पुणे ग्रामीणच्या निर्भया कमिटीच्या सदस्या वैशाली रानडे, : स्त्री आधार केंद्र, गणेशनगर, धायरीगाव : स. ११.३०
- **बलराज साहनी-साहिर लुधियानवी फाउंडेशन :** मुजफ्फर सय्यद यांच्या ‘मातृभूमी’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन : हस्ते- साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, प्रमुख पाहुणे : लक्ष्मीकांत देशमुख : साहिर यांचे जीवन व काव्य या विषयावर व्याख्यान, वक्ते : शलाका गोळे, : महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रोड : सायं. ५
- **आर्य थिएटर्स :** ‘आलटून पालटून’ या कार्यक्रमाचे सादरीकरण, सादरकर्ते : डॉ. मधुसूदन घाणेकर व ऋचा थत्ते, : स्काउट ग्राउंड सभागृह, उद्यान प्रसाद मंगल कार्यालयासमोर, सदाशिव पेठ : सायं. ५
- **आंतरराष्ट्रीय दीर्घायू केंद्र :** आयएलसीआय पुरस्कारांतर्गत सर्वोत्कृष्ट ज्येष्ठ नागरिक संघ, बी. जी. देशमुख जीवनगौरव पुरस्कार आणि एस. डी. गोखले उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार याचे वितरण, हस्ते : पद्मश्री लीला पूनावाला, प्रमुख पाहुणे : डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. रघुनाथ माशेलकर, जयंत उमराणीकर, डॉ. के. एच. संचेती, : विधी महाविद्यालय सभागृह, भारती विद्यापीठ, मोरे विद्यालय परिसर, पौड रस्ता, कोथरूड : सायं. ५
- **रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी :** ‘अक्षरनंदन’च्या संस्थापक विद्या पटवर्धन आणि ज्येष्ठ शिक्षक, साहित्यिक डॉ. कृ. पां. देशपांडे यांना गुरुवर्य आबासाहेब व इंदिरा अत्रे पुरस्काराचे वितरण, : रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी, सोमवार पेठ : सायं. ५.३०
- **बालरंजन केंद्र :** वाद्यांची ओळख उपक्रमांतर्गत विविध तालवाद्यांची ओळख, : सहकार सदन, भारती निवास सोसायटी, प्रभात रस्ता, गल्ली क्र १४, एरंडवणा : सायं. ५.३०
- **निनाद, पुणे व निनाद पतसंस्था :** देवदिवाळीनिमित्त वैकुंठात रंगावली व दीपोत्सव, हस्ते : पालकमंत्री गिरीश बापट, प्रमुख उपस्थिती : भाजपचे शहराध्यक्ष योगेश गोगावले, : वैकुंठ स्मशानभूमी, नवी पेठ : सायं. ५.३०
- **श्री म्हाळसाकांत देवस्थान मंदिर :** चंपाषष्ठी उत्सव, गायन : महेश काळे, : श्री म्हाळसाकांत देवस्थान मंदिर, बुधवार पेठ : रात्री ८


ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT PROGRAMME ON

**SOLAR ENERGY**

उद्यमी लभते सिद्धिम् niesbud

HOW TO GET INTO THE BUSINESS OF SOLAR

राष्ट्रीय उद्यमिता एवं लघु व्यवसाय विकास संस्थान (निसबड)
The National Institute for Entrepreneurship & Small Business Development (NIESBUD)
Ministry of Skill Development and Entrepreneurship, Govt. of India
A-23, Sector-62, Noida U.P.-201 309, ISO 9001 : 2008 Certified

Date- 3rd & 4th December, 2016 (Two Days) | Time: 10 AM to 5:30 PM
FEES: Rs. 7,500/- Includes course fees, Certificate, Soft Study Material, Lunch
VENUE : THE AMBASSADOR HOTEL,1125, MODEL COLONY, OFF. F.C.ROAD, SHIVAJI NAGAR, PUNE-411016.

Course Content- Starting of a solar business I Centre & state Polices I Business Models I ROI & Payback I Installation & Designing of a solar system I Technology & Component I Site analysis I Load Calculation I Registration & Government support I Net metering policy

SOLAR SYSTEM OFF GRID/ON GRID/THERMAL)BUSINESS OPPORTUNITIES(PANEL MANUFACTURING)

WHO SHOULD ATTEND THIS?
ARCHITECTS | INDUSTRIALISTS | CONSULTANTS | ENTREPRENEURS
RETIRED PEOPLE | PEOPLE IN SERVICE | CORPORATES | ENGINEERS | STUDENTS

PRACTICAL SESSIONS | REGISTRATION ON VENUE IS ACCEPTED
FOR MORE DETAILS AND REGISTRATION CONTACT | LIMITED SEATS
Coordinator- 9711876249, 9953920498 | www.niesbud.nic.in
CERTIFICATE WILL BE AWARDED



MSME MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम

PPDC

**MSME TECHNOLOGY DEVELOPMENT CENTER**
MINISTRY OF MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES
Government of India Organization
Foundry Nagar, Agra-282006

ORGANISES

JOB & PRACTICAL ORIENTED TRAINING ON

**INDUSTRIAL AUTOMATION**
*Basic Instrumentation, PLC (B & R & Siemens), SCADA, HMI, Motion Control*

| | | |
|---|---|---|
| Date | 17th Dec 2016 | |
| Duration | 100 Hrs | |
| Time | Sat-Sun | 10am - 6pm |
| | Mon-Fri | 10am-1.30pm & 2.30pm-6pm |
| Eligibility | Any Diploma/BE, Working Professionals, Entrepreneurs, Industrialist | |
| Fees | Rs. 10,000/-(For All Category) | |

VENUE
ENGINEERING CLUSTER
At Plot No. 51, D-1, Block, MIDC, Chinchwad, Opp. Bird Valley Garden, Nr. Indian Oil Godown, Pune-411019.

*Placement Assistance & Industrial Visit*
Contact : 9595715702, 9011356110 Email : training@enggclusterpune.com
*Soft Study Material & Hostel Facility Available*
*Govt. Certificate will be Awarded*



**INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT KASHIPUR**
IIM KASHIPUR
Bazpur Road, Dist. Udham Singh Nagar, Kashipur-244713, Uttarakhand

**Invites applications for Doctoral Programmes**

1. Fellow Programme in Management (FPM)
2. Executive Fellow Programme in Management (EFPM)
3. Special Drive for SC/ST candidates in FPM for future faculty positions in IIMs*

Last Date of Application is 15 March, 2017; Commencing in July 2017

Specialization Areas
- Operations Management and Decision Sciences (Operations Research/Statistics)
- Organizational Behavior and HRM
- Marketing
- Finance
- Information Technology & Systems
- Strategic Management (only for FPM)
- Economics and Business Environment
- Business Communication

For details visit: www.iimkashipur.ac.in
e-mail: doctoraladmission@iimkashipur.ac.in
*Special drive candidates will be provided additional financial support for teaching assistantship



**Honeywell**
Honeywell Automation India Limited
CIN: L29299PN1984PLC017951
Phone: +91 20 6603 9400
Fax: +91 20 6603 9800

**Notice to the Equity Shareholders**

This notice is published pursuant to the provisions of the Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016 notified by Ministry of Corporate Affairs effective September 7, 2016 with respect to transfer of equity shares of the Company to Investor Education and Protection Fund Suspense Account.

The Rules interalia, contain provisions for transfer of all the shares in respect of which dividend has not been paid or claimed by the shareholders for seven consecutive years or more in the name of Investor Education and Protection Fund (IEPF) Suspense Account

Adhering to the various requirements set out in the rules, the Company has dispatched the letter individually to the concerned shareholders whose equity share/s are liable to be transferred to IEPF under the Rules for taking appropriate action(s).

The Company has uploaded the full details of such shareholders and shares due for transfer to IEPF on its website: http://www.honeywellautomationindia.com. Shareholders are requested to refer the link to verify the details of unencashed dividend and the shares that are liable to be transferred to the IEPF.

Shareholders may note that both the unclaimed dividend and the shares transferred to the IEPF including all the benefits accruing on such shares, if any, can be claimed back by them from IEPF Authority after following the procedure prescribed by the Rules.

The concerned shareholders, holding shares in physical form and whose shares are liable to be transferred to IEPF, may note that the Company would be issuing duplicate share certificate(s) in lieu of the original share certificate(s) held by them for the purpose of transfer of shares to IEPF as per the Rules and upon such issue, the original share certificate(s) which stand registered in their name will stand automatically cancelled and be deemed non-negotiable. The shareholders may further note that the details uploaded by the Company on its website should be regarded and shall be deemed adequate notice in respect of issue of the duplicate share certificate(s) by the Company for the purpose of transfer of shares to IEPF pursuant to the Rules.

In case no valid claim in respect of equity shares are received from the shareholders by December 5, 2016 or such other date as may be extended, the Company shall, with a view to complying with the requirement set out in the rules, transfer the shares to IEPF by the due date as per the procedure stipulated in the Rules. Please note that no claim shall lie against the Company in respect of unclaimed dividend amount and equity shares transferred to the IEPF.

In case you need any further information/clarification please write to or contact our RTA M/s **TSR DARASHAW LIMITED**, Unit: Honeywell Automation India Limited 6-10, Haji Moosa Patrawala Industrial Estate, 20, Dr. E. Moses Road, Near Famous Studio, Mahalaxmi, Mumbai 400 011 Tel.No: Tel: (022) 66568484, e-mail: csg-unit@tsrdarashaw.com

For **Honeywell Automation India Limited**

**Place** : Pune
**Date** : November 29, 2016

**K. V. Ananthanarayanan**
Head-Legal

**Regd. Office:** 56 & 57, Hadapsar Industrial Estate, Pune 411 013
**E-mail:** HAIL.InvestorServices@Honeywell.com | Website: www.honeywellautomationindia.com



**BAJAJ FINANCE LIMITED**

**Registered Office:** Akurdi, Pune 411 035
**Corporate Office:** 4th Floor, Bajaj Finserv Corporate Office, Off Pune - Ahmednagar Road, Viman Nagar, Pune - 411 014

**Fixed Deposit Schemes**
**‘FAAA/Stable’ Rating by CRISIL | ‘MAAA (Stable)’ Rating by ICRA**

‘FAAA/Stable’ Rating by CRISIL AND ‘MAAA (Stable)’ Rating by ICRA indicate the highest degree of safety with regard to timely payment of interest and principal on the instrument.

**Retail rate of interest per annum valid up to ₹5 crore (W.e.f. 5 December 2016)**

| Tenure in months | Cumulative | Non-Cumulative | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Monthly | Quarterly | Half Yearly | Annual |
| 12 – 35 | 8.00% | 7.72% | 7.77% | 7.85% | 8.00% |
| 36 – 60 | 8.05% | 7.77% | 7.82% | 7.89% | 8.05% |

a) Senior Citizens (more than 60 years of age, subject to provision of proof of age) – Additional rate of 0.25% p.a. for deposit size up to ₹1 crore

b) Bajaj Group Employees – Additional rate of 0.10% p.a. (BHIL, BAL, BFS, BFL, MSL, BAGIC, BALIC, MUKAND and BAJAJ ELECTRICALS) for deposit size up to ₹1 crore

c) Bajaj Finance Limited existing loan customers and FD renewal customers – Additional rate of 0.10% p.a. for deposit size up to ₹1 crore

d) Only one of the above special category benefit is allowed per transaction

e) Rate of interest for bulk deposits of more than ₹5 crore may vary from the published card rate and to be decided on a case to case basis by Bajaj Finance Limited

All other terms and conditions of the fixed deposit scheme of the Company as approved by the Board of Directors at its meeting held on 26 July 2016 remain the same.

For **Bajaj Finance Limited**

Date: 22 November 2016
Place: Pune

**Rajeev Jain**
**Managing Director**

**HOW TO INVEST:**
The amount should be deposited only by cheque made payable to "BAJAJ FINANCE LTD - ACCOUNT NUMBER 00070350006738" and crossed "Account Payee only". The cheques should be payable at par and CTS compliant. Application Form along with the necessary remittance should be sent to the distributors of the Fixed Deposit Schemes of Bajaj Finance Limited or be submitted at any of the Bajaj Finance Limited branches. **Write to us at fd@bajajfinserv.in or call us on 020 30405646.**



